# बांधकाम विभाग,जि.प. वाशिम

## निविदा सुचना क्रमांक २४ ( १ ली वेळ)

## (सन २०१६-२०१७)

खालील कामाच्या मोहरबंद निविदा, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद वाशिम येथे फक्त जिल्हा परिषद कडे स्वतंत्र पंजीकरण असणा-या पात्र कंत्राटदाराकडून (सुशिक्षित बेरोजगार अभियंता, व मजुर कामगार सहकारी संस्था वगळून)**ब-१** दर करारावर मागविण्यात येत आहेत. को-या निविदेची नमुना प्रपत्रे कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जि.प. वाशिम यांचे कार्यालयात निविदा शाखेमध्ये दिनांक १४/ ३ /२०१७ पासून ते दिनाक १८/०३/१ /२०१७ पर्यत कार्यालयीन वेळेमध्ये वितरीत करण्यात येतील.

सिलबंद भरलेल्या निविदा दिनांक १८ /०३ /२०१७ ला ला दुपारी ३.०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील व शक्यतो त्याच दिवशी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | तालुका | अंदाजित किंमत रुपये लाखात | इसारा रक्कम रुपये | को-या निविदे | काम पुर्ण करण्याची मुदत | प्रव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नामदेव बाबा मंदिर तुळजापुर ता.कारंजा येथे स्वंयपाकरग करणे | कारंजा | २.८७ लक्ष रु. | २९००/- | १००/- | ३१ मार्च १७ | कंत्रा |
| ०२ | महादेव संस्थान तपोवन येथे सौंदर्यीकरण करणे | मालेगाव | २.०० लक्ष रु. | २०००/- | १००/- | ३१ मार्च १७ | कंत्रा |
| ०३ | सांस्कृतिक सभागृह वाशिम विदयुतीकरण | वाशिम | २.०० लक्ष रु. | २०००/- | १००/- | ३१ मार्च १७ | कंत्रा |
| ०४ | मोहजा ते सावरगांव जिरे रस्त्यावरील सा.क्र. ०/९०० मध्ये १ मोरीचे बांधकाम करणे इजिमा ५४ | वाशिम | ३.००लक्ष रु. | ३०००/- | १००/- | ३१ मार्च १७ | कंत्रा |
| ०५ | मौजे दगडउमरा ता.जि. वाशिम येथील दगड उमरा फाटा ते सुपखेला येथे रस्त्याचे बांधकाम करणे | वाशिम | ९.७१लक्ष रु. | ९७१०/- | १००/- | ३१ मार्च १७ | कंत्रा |
| ०६ | जयभोले संस्थान भोयता येथे पेवर ब्लॉक रस्ता करणे | वाशिम | २.७० लक्ष रु. | २७००/- | १००/- | ३१ मार्च १७ | कंत्रा |
| ०७ | देवी संस्थान पोहा येथे सभागृह बांधकाम करणे | कारंजा | २.५० | २५००/- | १००/- | ३१ मार्च १७ | कंत्रा |

निविदेच्या शर्ती व अटी :-

१. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता सरसकट रद्द करण्याचा सर्व अधिकार खालील स्वाक्षरी करणा-यांनी राखून ठेवला आहे.

२. जिल्हा परिषदेचे योग्य त्या वर्गात पंजीकरण असलेल्या(सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर कामगार सहकारी संस्था वगळून) फक्त कंत्राटदारांनी निविदा स्पर्धेत भाग घ्यावा.

३. कोरे निविदा प्रपत्राची मागणी करतांना अर्जासोबत विधीग्राहय प्रमाणपत्रांची साक्षांकित असलेली सत्य प्रत सादर करावी लागेल. त्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच कंत्राटदारांचे अर्जासोबत जिल्हा परिषदेची व शासनाची व त्यांच्याकडे असलेल्या कामाचा निविदा बाबत सविस्तर व सद्यस्थिती बाबतची लेखी माहिती सोबत जोडावी लागेल.कोरे निविदा फार्म कंत्राटदाराचे प्रतिनिधीला बिना अधिकारपत्राशिवाय देता येणार नाही. तसेच वरील यादीतील कामामध्ये फेरबदल किंवा काम रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

४. बयाना रक्कम राष्ट्रीयकृत व शेडयुल्ड बँकमध्ये आर.टी.जी.एस चे स्वरुपात मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.वाशिम यांचे नावाने एक वर्ष मुदतीचे घ्यावे लागेल. इसारा रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

५. निविदा दोन लिफाफे पध्दतीने भरावी लागेल. त्यापैकी पहिल्या लिफाफ्यामध्ये निविदेच्या दिवशी ग्राहय असलेली आयकर प्रमाणपत्रांची /विधीग्राहय पंजीयनची सत्यप्रत,विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत, मुल्यवर्धीत कर (व्हॅट), नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडाव्या लागतील. तसेच विक्रीकर/व्हॅट भरणा केल्याबाबतच्या प्रमाणपत्रांची सत्यप्रत जोडावी लागेल. व्यवसाय कर भरणा केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत व आपण केलेल्या कामाचे वर्कडन प्रमाणपत्र सोबत जोडावे.

६. निविदा स्विकृतीनंतर करारनामा करतेवेळी कंत्राटदाराच्या कामाच्या अंदाजीत रक्कमेच्या किंमतीच्या दोन टक्के सुरक्षा ठेव भरल्याशिवाय कामाचा आदेश मिळणार नाही. त्याचप्रमाणे कामांच्या देयकातून दोन टक्के सुरक्षा ठेव कपात करण्यात येईल. निविदेत नमूद केलेल्या कालावधीत काम पुर्ण (प्रशासकीय अडचणी किंवा नैसर्गिक आपत्ती सोडून) करावे लागेल. याचे उल्लंघन झाल्यास त्यामुळ प्रशासनाला पर्यायी व्यवस्थेकरीता जादा खर्च करावा लागला तर त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

७. ज्या योजनेची कामे विदयुत कामांशी संबंधीत असतील अशा निविदा पत्रासोबत विदयुत कंत्राटदारांचे ना- हरकत प्रमाणपत्र जोडावे लागेल.

८. निविदा प्रमाणपत्रातील योग्य त्या ठिकाणी अक्षरी व अंकात दर भरुन कंत्राटदाराने स्वाक्षरी न केल्यास व दिल्यास निविदा अवैध ठरविण्यात येईल.

९. निविदा दर देतांना त्यामधून खोडतोड तसेच दर अंकात व अक्षरी /लेखी स्पष्ट दिसेल असे लिहावे. दोन्ही दरात तफावत असल्यास सर्वात कमी दर विचारात घेण्यात येतील.

१०. निविदा उघडल्यानंतर दर ९० दिवस वैध राहील.

११. महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण१०९६/३००/९८पी/प्री.(क्र.)मंत्रालय, मुंबई दिनांक २१/१२/९६ च्या अन्वये work – Contract Tax Act प्रमाण पत्र सादर करावे.

१२. सिमेंट, स्टिल,पाईप ईत्यादी साहित्य कंत्राटदारास देय राहणार नाही. तसेच कामासाठी वापरण्यात येणा-या दर्जासोबत त्याची गुणवत्ता व दर्जासंबंधी चाचणी अहवाल संबंधीत यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा लागेल. त्यानुसार योग्य दर्जाचा साहित्य उपयोगात आणता येईल.

१३. निविदेची किमत प्रकाशित किमतीपेक्षा जास्त किंवा कमी होऊ शकते.

१४. निविदेसोबत बयाणा रक्कम भरण्यापासून सुट बंद करण्यात आली आहे.

१५. प्रत्येक प्रकारच्या कंत्राटीकामाच्या व ते कंत्राटी काम पुर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणा-या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक राहील.

१६. सदरहू कामांची देयके निधी उपलब्धतेनुसार अदायगी करण्यात येतील.

१७. सदर निविदा रद्द करणे, अथवा त्यात बदल करणे यांचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी राखून ठेवले आहेत.

| | | |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता(बांध) | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा परिषद वाशिम | जिल्हा परिषद वाशिम | जिल्हा परिषद वाशिम |